# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांचे कार्यालय

(बिएसएनएल संचार लक्ष्मी भवन, कस्तुरचंद पार्कजवळ, नागपूर-४४० ००१, दुरध्वनी क्रमांक ०७१२-२५६२ २५०)


कक्ष-३/आस्था/क/प्रक्र ६४/१७.१८/ ३१४ नागपूर. दिनांक ०७/०१/२०१९

## आदेश

१. उपवनसंरक्षक, भंडारा यांनी त्यांचे अधिनस्थ असलेले वनरक्षक व वनपाल यांचे विरुध्द केलेल्या शिस्तभंगविषयक कार्यवाही संदर्भात पारीत केलेल्या आदेशांविरुध्द संबंधीत वनरक्षक व वनपाल यांनी या प्राधिकरणाकडे अपील अर्ज दाखल केले आहेत. उपवनसंरक्षक भंडारा यांनी सुरु केलेल्या सर्व शिस्तभंगविषयक प्रकरणे जवळपास सारख्याच मुद्यांवर आधारीत असून संबंधीत वनरक्षक व वनपाल यांनी (यात यापुढे "अपीलकर्ता" म्हणून संबोधले जाईल) सादर केलेल्या अभिवेदनावर व उपवनसंरक्षक भंडारा यांनी शिस्तभंगविषयक प्राधिकरण म्हणून पारीत केलेले आदेशही जवळपास सारखेच असल्याने या प्राधिकरणाद्वारे उपरोक्त सर्व अपील प्रकरणांवर एकत्रितपणे विचार करण्यात येत आहेत. अपीलकर्त्यांची नावे, शिस्तभंगविषयक प्राधिकरण म्हणून उपवनसंरक्षक भंडारा यांनी जारी केलेल्या दोषारोपपत्राचा दिनांक, अपीलकर्त्यांनी सादर केलेले अभिवेदन, शिस्तभंगविषयक प्राधिकरणाने पारित केलेले शिक्षेबाबतचे आदेश व अपील अर्जाची दिनांकाबाबत तपशिल दर्शविणारा तक्ता या आदेशासोबत सहपत्रीत आहे.

### पार्श्वभूमी

२. वनरक्षक आणि वनपाल हे वनविभागात गट-क संवर्गातील पद आहेत. वनरक्षक आणि वनपाल या पदाच्या जबाबदा-या महाराष्ट्र वनसंहिता खंड क्र.१ मध्ये अंतर्भुत करण्यात आलेली आहे. या व्यतिरीक्त शासकीय सेवक म्हणून महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक), नियम १९७९ मधील सर्व तरतूदी वनरक्षक व वनपालांवर यथास्थितीत लागू आहेत. शासन निर्णय महसूल व वनविभाग क्र.एमएससी-२००४/प्रक्र२१/(भाग३)/ फ-२ दि.४/८/२०१४ अनुसार वनविभागाचे संगणकीकरणाबाबत धोरण जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार वनरक्षकांनी PDA व GPS या यंत्राचा वापर करुन आवश्यक माहिती संकलीत करण्याबाबत व त्या माध्यमातून क्षेत्रिय कामावर संनियंत्रण ठेवण्याबाबत धोरण जाहिर करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णय अद्यापही अंमलात आहे.

३. उपवनसंरक्षक भंडारा यांनी जारी केलेल्या दोषारोप पत्रानुसार अपीलकर्त्यांनी GPS व PDA यंत्र हाताळण्यास नकार देऊन सदरची यंत्रे परत केलीत. उपवनसंरक्षक, भंडारा यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण अटी व शर्ती), नियम १९८१ मधील नियम ३४ चा उल्लेख करुन शासन धोरणानुसार GPS व PDA यंत्र वापर करणे अपीलकर्त्यांवर बंधनकारक असूनही त्यांनी सदर

यंत्रे वापर न करण्याचा असहकार्यात्मक भूमिका घेतली असल्याचा निष्कर्ष काढला आहे. त्यामुळे त्यांचेकडून महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक), नियम १९७९ मधील नियम ६ चा भंग केल्याचाही आदेशात उल्लेख आहे. तसेच वरीलप्रमाणे नियमांचा भंग झाल्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक), नियम १९७९ मधील नियम ३ चा देखील भंग झाल्याचा उल्लेख आहे.

४. दोषारोपपत्रांच्या अनुषंगाने अपीलकर्त्यांनी अभिवेदन सादर केलेले आहेत. त्यात त्यांनी सर्वसाधारणपणे भूमिका घेतलेली आहे की ते महाराष्ट्र वनरक्षक व वनपाल संघटना,नागपूर यांनी GPS व PDA यंत्र वापराबाबत पुकारलेल्या असहकार आंदोलनात सहभागी झाले होते मात्र नंतर सदर आंदोलन मागे घेण्यात आले व त्यानंतर उक्त यंत्राचा पुर्ववत वापर सुरु करण्यात आलेला आहे. जवळपास सर्व अपीलकर्त्यांनी ते केव्हाही संपात गेले नसल्याचे अभिवेदनात नमूद केले आहेत.

५. उक्त प्रमाणे प्राप्त अभिवेदनाचा विचार करुन उपवनसंरक्षक,भंडारा यांनी अपीलकर्ता हे संपात सहभागी झाल्याचा निष्कर्ष काढून भावी काळात परिणाम होणार नाही अशा रितीने त्यांची पुढील एक वेतनवाढ रोखण्याची शिक्षा ठोठावली आहे.

६. उपवनसंरक्षक,भंडारा यांचे उक्त स्वरुपाचे आदेशाविरुध्द प्रस्तुत अपील अर्ज प्राप्त झाले आहेत. अपीलकर्त्यांनी संपात सहभागी झाले नसल्याची भूमिका घेऊन त्यांचेद्वारा महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक), नियम १९७९ मधील नियम ६ चा भंग झाला नसल्याचे नमूद केले आहेत. मात्र काही अपीलकर्त्यांनी अशीही भूमिका घेतली आहे की, सर्वसाधारणपणे शासकीय कर्मचाऱ्यास प्रति दिवस ८ तासाचे काम करण्याची जबाबदार असते. मात्र GPS व PDA यंत्र हे मागील ८-१० वर्षात विकसीत करण्यात आले असून त्याच्या वापरामुळे वनरक्षकांवर कामाचा अतिरीक्त ताण येत आहे. या सर्व बाबी शासनाचे निर्दशनास आणण्यासाठी महाराष्ट्र वनरक्षक व वनपाल संघटना, नागपूर यांनी आयोजित केलेल्या बहिष्कारामध्ये काही वनरक्षक सहभागी झाले होते मात्र संघटनेने कालांतराने सदर बहिष्कार मागे घेतत्यानंतर वनरक्षक म्हणुन वरिष्ठांचे आदेशानुसादर ते पुर्ववत कामे करीत आहेत. अशाप्रकारे निवेदन सादर करुन अपीलकर्त्यांनी त्यांना दोषमुक्त करण्याची विनंती केली आहे.

## विवेचन

७. उपरोक्त प्रमाणे अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर या प्राधिकरणाने शिस्तभंगविषयक प्राधिकरण तथा उपवनसंरक्षक, भंडारा यांचे लेखी स्पष्टीकरण प्राप्त झाले केले. तसेच त्यांचे कार्यालयातील नस्त्या सुध्दा बोलावून त्यांचे अवलोकन केले. उपवनसंरक्षक, भंडारा यांचे लेखी स्पष्टीकरणावरुन दिसून येते की सर्वसाधारणपणे अपीलकर्त्यांनी वनरक्षक-वनपाल संघटनेने माहे डिसेंबर-१७ च्या सुमारास GPS व PDA यंत्राचा वापर संबंधात बहिष्काराची भूमिका घेतल्यानंतर सदरची यंत्रे विरोध

स्वरुपात परत केली होती. उपवनसंरक्षक,भंडारा यांचेनुसार अपीलकर्त्यांनी शासन विरोधात भूमिका घेतली होती. तथापी अशा प्रकारे विरोधास्पद भूमिका घेतांना अपीलकर्ता संपात सहभागी झाले होते, असा निष्कर्ष काढता येत नाही. कारण की कोणतेही वनरक्षक हे पुर्णपणे कामे थांबवून संप किंवा त्या सारख्या आंदोलनात सहभागी झाले, असे दस्तऐवजावरुन दिसून येत नाही. दोषारोप पत्रातही अपीलकर्ता केव्हा व किती कालावधीसाठी संपात सहभागी होते या उल्लेख दिसून येत नाही. सबब प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्याद्वारे वर्तणूक नियमावलीच्या नियम ६ चा भंग झाला आहे अशी परिस्थिती दिसून येत नाही. तथापी महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण अटी व शर्ती), नियम १९८१ मधील नियम ३४ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम ३ (१) मधील तरतूदीत अगदी स्पष्ट असून नियम ३ विचारात घेता कोणताही शासकीय सेवक शासन धोरणा विरुध्द भूमिका घेऊ शकत नाही. या दृष्टीने संघटनेचे आवाहनावर शासनाचे विरोधात भूमिका घेणे कोणत्याही शासकीय सेवकाकडून अपेक्षित नाही.

८. या ठिकाणी प्रकर्षाने नमूद करण्यात येते की महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम ३० कडे सर्व अपीलार्थींचे लक्ष वेधणे आवश्यक वाटते. नियम ३० खालीलप्रमाणे आहे.

"An Association which is not recognised shall not be entitled to submit any representation or memorial or send any deputation in respect of any matter affecting government servants or a class of such servants."

नियम २९ मध्ये संघटना शासन मान्यता देण्याबाबतची तरतूद आहे. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संघटना १५१६/प्रक्र २७३/२०१६/१६-अ दि.२ जानेवारी २०१७ मध्ये उक्त नियम २९ चा संदर्भ देऊन राज्यातील शासन मान्य संघटनेची यादी देण्यात आली आहे. उपरोल्लेखीत वनरक्षक-वनपाल संघटना उक्त यादीत समाविष्ट नाही. सदर शासन निर्णयात असेही नमूद आहे की *महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ च्या नियम २९ खाली शासन मान्यता प्राप्त नसलेल्या संघटनांची निवेदने जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत वा संघटनांकडून शासनास थेट प्राप्त होत आहेत. अशा निवेदनांची शासन स्तरावर दखल घेतली जाणार नाही, असे संदर्भाधीन शासन परिपत्रक दि.१०/१०/१९९१ व शासन पत्र दि.११/०५/२०११ अन्वये अशासूचनांचे पुनरोच्चार करण्यात आले आहेत. तरीदेखील शासन मान्यता प्राप्त नसलेल्या संघटनांची त्यांच्या प्रलंबित मागण्या संदर्भात, निवडणुक कार्यकारिणीबाबत, शासनाकडे बैठक आयोजित करण्याबाबत शासनास निवेदने ब-याच प्रमाणात प्राप्त होत असल्यामुळे शासन मान्यता नसलेल्या संघटनांकडून प्राप्त होणा-या कुठल्याही निवेदनाची, अभिवेदनाची, पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येऊ नये, अशा सूचना देण्यात येत आहेत.*

९. तथाकथित महाराष्ट्र वनरक्षक व वनपाल संघटना,नागपूर हि शासनमान्य संघटना नाही. शासकीय सेवकाची निष्ठा ही शासनाप्रती असणे आवश्यक असतांना, शासनमान्य नसलेल्या संघटनेच्या आवाहनावर शासनाचे विरोधात भूमिका घेणे हे निश्चितपणे शासकीय सेवकांसाठी अशोभनीय वर्तन आहे. यादृष्टीने अपीलकर्त्यांनी वर्तणूक नियमातील नियम ३ (१) चा भंग केला आहे. हे स्पष्ट होते.वर

नमूद केल्याप्रमाणे अपीलकर्ता हे संपात सहभागी झाले नसल्याने उपवनसंरक्षक, भंडारा यांनी दिलेली शिक्षा ही अपीलकत्याकडुन झालेले गैरवर्तणुकीच्या प्रमाणापेक्षा जास्त ठरत आहे. या निष्कर्षाप्रत मी आलेलो आहे.

या पार्श्वभूमीत महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमावली, १९७९ क्ष्या नियम २२ (२) (c) (i) मधील अपीलीय प्राधिकाणास प्राप्त शक्तीचा वापर करुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

**१) अपील अर्ज स्वीकृत करण्यात येत आहे.**
**२) उपवनसंरक्षक ,भंडारा यांनी प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्यां सदर्भात ठोठावली शिक्षेबाबतचे सर्व आदेश याद्वारे रद्यबातल ठरविण्यात येत आहे.**
**३) अपीलकर्त्यांवर ठपका ठेवण्यात येत आहे.**

**सहपत्र-**परिच्छेद १ मधील उल्लेखीत
तपशिल दर्शविणारा तक्ता

7/1/19
(संजीव गौड)
मुख्य वनसंरक्षक (प्रा.),नागपूर
तथा
अपीलीय प्राधिकरण

प्रति,
सोबतच्या तक्त्यातील उल्लेखीत सर्व अपीलकर्ता
भंडारा वनविभाग

प्रतिलीपी:- उपवनसंरक्षक,भंडारा यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
प्रतिलीपी:- www.mahaforest.gov.in

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नागपूर यांचेकडील आदेश कक्ष-३/आस्था/क/प्र.क्र.६३/१७-१८/ ३१४ दि. ०७/०१/२०१९ चे सहपत्र

| अ.क्र. | अपीलकर्त्याची नावे | शिस्तभंग विषयक प्राधिकरण म्हणुन उपवनसंरक्षक भंडारा यांनी जारी केलेल्या दोषारोपपत्राचा दिनांक | | अपीलकर्त्यानी सादर केलेल्या अभिवेदनाचा दिनांक | शिस्तभंगविषयक प्राधिकरण यांनी पारित केलेले आदेशाचा क्रमांक व दिनांक | | अपील अर्जाचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्रमांक | दिनांक | | क्रमांक | दिनांक | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | श्री.आर.टी.मेश्राम,वनरक्षक | ४१४५ | २६-०३-२०१८ | १६-०४-२०१८ | ११२९ | २९-०६-२०१८ | ०१-०८-२०१८ |
| २ | श्री.सी.एन.गाढवे, वनरक्षक | ३४११ | ०९-०२-२०१८ | ०२-०४-२०१८ | १००३ | २७-०६-२०१८ | दिनांक नसलेला अर्ज |
| ३ | श्री.आशीष व्ही.सालवनकर, वनरक्षक | ३४१८ | ०९-०२-२०१८ | ०९-०४-२०१८ | ११११५ | २९-०६-२०१८ | ०६-०८-२०१८ |
| ४ | श्री.मनोहर एच. कोटेवाड,वनरक्षक | ४२०४ | २६-०३-२०१८ | १३-०४-२०१८ | ८५३ | १४-०६-२०१८ | २०-०८-२०१८ |
| ५ | श्री.एफ.ए.खान, वनरक्षक | ३४२९ | ०९-०२-२०१८ | ०९-०४-२०१८ | १११६ | २९-०६-२०१८ | Aug-१८ |
| ६ | श्री.क्रिष्णा नानाजी मस्के, वनरक्षक | ४११० | २२-०३-२०१८ | ०४-०४-२०१८ | १०९६ | २९-०६-२०१८ | ०७-०८-२०१८ |
| ७ | श्री.टी.एच.घुले, वनरक्षक | ३४०६ | ०९-०२-२०१८ | ०४-०४-२०१८ | १०१० | २७-०६-२०१८ | ११-१०-२०१८ |
| ८ | श्री.एस.एम.रामटेके,वनरक्षक | ३४०५ | ०९-०२-२०१८ | ३१-०३-२०१८ | १००६ | २७-०६-२०१८ | १५-०८-२०१८ |
| ९ | कु.बबीता लक्ष्मणराव डोरले,वनरक्षक | ३४२० | ०९-०२-२०१८ | ०१-०४-२०१८ | ११२२ | २९-०६-२०१८ | ०६-०८-२०१८ |
| १० | कु.एन.जी.निरदुडे, वनरक्षक | ४१०७ | २२-०३-२०१८ | ०५-०४-२०१८ | १०८२ | २९-०६-२०१८ | २५-१०-२०१८ |
| ११ | व्ही.वाय.उगले,वनरक्षक | ४१४६ | २६-०३-२०१८ | १०-०४-२०१८ | १०२३ | २७-०६-२०१८ | दिनांक नसलेला अर्ज |

मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यांचे कार्यालय नागपूर

७/१/१९

(संजीव गौड)
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
नागपूर